# Sant Gadge Baba Amravati University, Amravati

NAAC Accredited with "A"Grade

# ACE

(Academic, Co-curricular & Extra-curricular Activities of Students)

Volume 1 | Sant Gadge Baba Amravati University Bulletin | Issue - 1st, March 2017




## मन की बात

*Exams in themselves, should be a joyous occasion. After a year of hard work, one has the opportunity to display one's capabilities so this should be a festival of joy and enthusiasm. Marks and mark-sheet serve a limited purpose. Life is not confined to these only. Life truly means what is the knowledge that you have acquired ! Life truly goes on in terms of whether whatever you have learned, you have tried to live that also! It is the knowledge that is going to be of use to you in life, so are skill, self-confidence and determination.*

**Hon'ble Prime Minister of India : Shri. Narendra Modi**






संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील तपोद्यान येथील संत गाडगे बाबांच्या संदेशशिल्पाचे अनावरण त्यांच्या जयंतीदिनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती माननीय श्री. चे. विद्यासागर राव यांचे हस्ते दि.२३ फेब्रुवारी २०१७ रोजी करण्यात आले.

## मा. कुलगुरूंचे मनोगत



कुठल्याही समाजात सांस्कृतिक मूल्यांच्या समृद्धीसाठी नवीन पिढीचे असणारे भान आणि त्यांनी दिलेले योगदान हे फार महत्त्वाचे ठरते. विशेषतः ज्ञानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था व विद्यार्थी त्यामध्ये मूलगामी भूमिका बजावू शकतात. ही बाब लक्षात घेता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांचेकडून अनेक स्तरावर अभ्यासपूरक तसेच अभ्यासेत्तर प्रयत्न केले जातात. या प्रयत्नात अनेकांनी नेत्रदीपक प्रगती केलेली असते. त्यांनी केलेल्या कार्याची योग्य अशी दखल घेऊन त्यास प्रसिद्धी देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचे विचार, भावना आणि विविध कलागुणांचा परिचय घडवून देण्यासाठी विद्यापीच्या वतीने 'ACE' हे विद्यापीठ वार्तापत्र प्रकाशित करण्याची कल्पना आहे.

'ACE' या विद्यापीठ वार्तापत्राच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची व यशाची नोंद घेतली जाऊन त्याचे एकप्रकारे दस्तऐवजीकरण केले जाईल. जेणेकरून इतर विद्यार्थ्यांपर्यंत माहिती पोहचून त्यांना प्रेरणा मिळेल तसेच यश मिळविलेले विद्यार्थी देखील समाजात नागरिक म्हणून वावरताना एक आदर्श भूमिका घेऊ शकतील. कुठल्याही अतिरेकाला विद्यार्थ्यांनी बळी न पडता जीवनाला पूरक अशी संतुलित भूमिका घेण्याचे भान जागृत व्हावे, त्यांच्यातील अभिनव कल्पकतेचा सर्जनशीलतेचा उत्तरोत्तर विकास व्हावा, याच व्यापक उद्देशाने 'ACE' विद्यापीठ वार्तापत्र संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे प्रकाशित होत आहे, याचा मला मनस्वी आनंद होतो आहे. यशश्री मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो व त्यांना पुढील आयुष्यासाठी सुयश चिंतितो !

**डॉ. मुरलीधर चांदेकर**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

## संपादकीय

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागात तसेच संलग्नित महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांनी संपूर्ण शैक्षणिक वर्षामध्ये अभ्यासक्रमाशी निगडीत, अभ्यासेत्तर तसेच अभ्यासपूरक उपक्रमांमध्ये प्राप्त केलेले पुरस्कार, उपलब्धी यांची योग्य दखल घेऊन त्यास प्रसिद्धी मिळावी व त्यायोगे इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, या उद्दात्त हेतूने मा. कुलगुरू महोदयांनी 'ACE' या विद्यापीठ वार्तापत्राच्या अभिनव उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली आहे.

विविध महाविद्यालयांमधून तसेच विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांमधून प्राप्त होणारी सर्व माहिती, आकडेवारी व उपक्रमांचा प्रसार सर्व वाचकांपर्यंत व्हावा या करिता मा. कुलगुरू महोदयांनी तज्ज्ञ समितीचे गठन करून नामवंत संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक वृंदांचा त्यामध्ये समावेश केलेला आहे. या तज्ज्ञ समिती सदस्यांनी प्राप्त माहितीतून निवडून दिलेल्या माहितीचा समावेश करण्याचा प्रयत्न संपादक मंडळाद्वारे यावेळी करण्यात आलेला आहे.

आपणासही या प्रथमतः प्रकाशित होणाऱ्या वार्तापत्रामध्ये काही बदल अथवा सुधार सूचवायचे असल्यास आपण आपल्या प्राचार्य/संस्था प्रमुखांच्या शिफारसीद्वारे त्या समिती सदस्यांकडे पाठवाव्यात तसेच त्याची एक प्रत आपल्या जिल्ह्यातील समिती प्रमुखांकडे सुद्धा माहितीकरिता अग्रेषित करावी, अशी विनंती या आवाहनाद्वारे आपणास करण्यात येत आहे. प्रकाशित होत असलेला हा प्रथम अंक अधिक दर्जेदार, वाचनीय, लोकप्रिय तसेच संग्राह्य व्हावा याकरिता सर्व समिती सदस्यांनी केलेल्या मौलिक प्रयत्नांचा उल्लेख करणे मी माझे आद्य कर्तव्य समजतो. भविष्यातही प्रकाशित होऊ घातलेल्या अंकांमध्ये अधिक दर्जेदार, उपयुक्त, प्रेरणादायी माहिती आपण आपले स्तरावर संकलित करून समिती सदस्यांकडे पाठवावी, अशी आपणास नम्र विनंती आहे. आपण केलेल्या अमूल्य सहकार्याबद्दल पुनश्च एकदा आभार व सहकार्याच्या अपेक्षेत.

**डॉ. एस.एफ.आर. खाद्री**

मुख्य संपादक **'ACE'**

## Life Coping Skills Development Centre:

The University has decided to establish a Life Coping Skills Development Centre for the overall development of the students admitted to various departments of University Campus.



Shri.Subhash Rathi, Raipur interacting with students

The centre has conducted workshop on Communication Skills, Skills at workplace, Personality Development in which 40, 48 and 31 students have participated respectively. The response was overwhelming for the first time organized workshop. The participants reported that they have never attended any such sort of workshop ever before in their educational life which according to them should be organized every year.



Dr. Nadeem Khan expressing his views.



Dr. Kishor Phule communicating with students



महाराष्ट्राचे सन्मा. मुख्यमंत्री मा. नामदार श्री. देवेन्द्रजी फडणवीस यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठास सदिच्छा भेट दिली असता चर्चा करताना.

## 'Train the Trainers' : Six days workshop on Soft skill, LMS and E-content development for the faculty members :

The six days work shop on soft skills development for the teachers in the various department of the University was organized by the faculty development cell of the University in association with Bio-informatics centre and HRDC. Learning Manage-ment System was set up on University Intranet and each faculty member learned to develop e–content on their res-pective subject area. They have also been trained for development of monitoring and evaluation system for students using SMS. Total 38 faculty members from 16 post graduate teaching departments have taken the benefit of the training program .




Inaugural function of workshop

## महिला सक्षमीकरण कार्यशाळा :

महिलांच्या सक्षमीकरणाच्या हेतूने सं.गा.बा.अमरावती विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या 'सुंदर मी होणार' या कार्यशाळेला युवतींनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. एक दिवसीय कार्यशाळे–मध्ये आरोग्य जागृती, स्वसंरक्षण, बौद्धिक व शारीरिकदृष्टया सुदृढ होण्याकरिता सुप्रसिद्ध समाजसेविका डॉ. राणी बंग, कुशल उद्योजक नेहा खरे, स्त्रीरोग व प्रसुतीतज्ज्ञ डॉ. जागृती शहा, पोलीस निरीक्षक निलिमा आरज, स.पो.नि. शीतल मालटे, ॲड. प्राजक्ता मशीदकर यांनी युवतींना उद्बोधित केले. या प्रसंगी पाचही जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधून सुमारे ५०० हून अधिक युवती सहभागी झाल्या होत्या.



सुप्रसिद्ध समाजसेविका डॉ. राणी बंग



कुशल उद्योजक नेहा खरे

## 'कॅम्पस टु कार्पोरेट' कोर्सबाबत टाटा कन्सलटन्सीशी सामंजस्य करार :

'कॅम्पस टु कार्पोरेट' संकल्पना घेवून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास साधून उद्योग जगताला लागणारी सक्षमता त्यांच्यात निर्माण व्हावी व त्याद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, रोजगारक्षम विद्यार्थी तयार व्हावा या अनुषंगाने अभ्यासक्रम तयार करण्यात आले. त्यामध्ये खालील बाबीचा समावेश आहे.

❋ इंग्रजी संवाद कौशल्य E-mail etc. ❋ मुलाखतीची तयारी Resume building, Soft Skills, Analytical Skills ❋ हाताळण्याची क्षमता ❋ व्यावसायिक सभ्यता व परिपूर्णता

प्रथमतः शिक्षकांना प्रशिक्षित (TOT - ट्रेन टू ट्रेनर्स) करून संलग्नित महाविद्यालयाद्वारा विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यात येईल. यासाठी TCS तर्फे ७० तासाचा अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला आहे.



टाटा कन्सलटन्सीशी सामंजस्य करार करताना

### शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्ग :

विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयात शिक्षकांना (Training & Placement Officer) प्रशिक्षित करण्यासाठी TCS च्या माध्यमातून अल्पकालीन प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले. त्यानंतर प्रशिक्षित शिक्षकांच्या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून रोजगारक्षम मनुष्यबळ तयार करण्यास व रोजगार उपलब्ध करण्यासाठी सुद्धा मार्गदर्शन करण्यात आले.

## ■ चर्चासत्र :मराठी–अभिजात, बोली आणि उपायोजित



चर्चासत्र : मराठी–अभिजात, बोली आणि उपायोजित उद्घाटन सोहळा

सं.गा.बा.अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागातर्फे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या सहकार्याने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.नागनाथ कोतापल्ले, मा.वसंत आबाजी डहाके, प्रा. नीलिमा गुंडी, डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. अजय देशपांडे, डॉ.रावसाहेब काळे तसेच अ.भा.मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी सुमारे २०० उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## ■ लोककला महोत्सव :



आदिवासी पारंपरिक नृत्य सादर करताना

सं.गा.बा.अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागातर्फे 'पारंपरिक लोक–कला स्वरूप आणि आविष्कार' या विषयाला वाहिलेल्या लोककला महोत्सवाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. लोकसंस्कृतीचे गाढे अभ्यासक श्री. वाहरू सोनवणे हे यावेळी उद्घाटक म्हणून उपस्थित होते. यामध्ये खम्मनाट्य, सुसुन गदली, गोंडी, फगवा, झाडीपट्टी दंडार, कोलाम दंडार गोंदानी परधानी ढेमसा इत्यादी आदिवासी पारंपरिक नृत्य प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये १७० कलाकारांनी सहभाग नोंदविला.

## ■ कथालेखन कार्यशाळा:



कथालेखन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मा.कुलगुरु डॉ.मुरलीधर चांदेकर

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील सेमाडोह या निसर्गरम्य परिसरामध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागातर्फे 'कथा–लेखन कार्यशाळे' चे आयोजन करण्यात आले होते. निवासी स्वरुपाच्या या कार्यशाळेत सुमारे ५० प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घेतला.



मनस्विनी लता रवींद्र मार्गदर्शन करताना

मंदावलेल्या कथा–लेखनाच्या काळात कथालेखनाकडे नवलेखकांना वळविण्यासाठी या कार्यशाळेचे प्रामुख्याने आयोजन करण्यात आले होते.

## ■ मराठी भाषा दिन :



अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे विद्यमान अध्यक्ष अक्षयकुमार काळे आपले विचार व्यक्त करताना

श्रेष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून दि. २७ फेब्रु.२०१७ रोजी 'मराठी भाषा गौरव दिना'चे भव्य व व्यापक स्वरुपात आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ग्रंथ दिंडी, ग्रंथ प्रदर्शनी, व्याख्यान व नृत्य नाट्य व संगीतमय 'कस्तुरी गंधित मायमराठी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे विद्यमान अध्यक्ष अक्षयकुमार काळे हे उद्घाटक म्हणून लाभले होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व अमरावती शहरातील एकोणवीस गणमान्य संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा दिन संपन्न झाला.



ग्रंथ दिंडीत सहभागी विद्यार्थी

## ■ शैक्षणिक यश संपादन :



महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती माननीय श्री.चे.विद्यासागर राव पुरस्कार प्रदान करतांना

सं.गा.बा.अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागातील कु. प्रज्ञा रवींद्र सरोदे या विद्यार्थीनीने उन्हाळी परीक्षा २०१६ मध्ये एम. ए. मराठी या विषया–मध्ये गुणवत्ता यादीत प्रथम येऊन सात सुवर्णपदके व एक रौप्य पदक प्राप्त केले आहे. विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक पदके प्राप्त करण्याचा मान देखील तिला मिळाला.

## ■ Academic Skill Development Programme :



Dr. S.P. Joshi explaining the tricks

Spoken English classes for the campus students from various departments of the University were conducted under the Academic Skill Development Programme from 1st Feb. to 9th Feb. 2017. The classes were conducted in the University Department of English and Coordinated by **Dr. S. P. Joshi,** HOD, English Department, Sant Gadge Baba Amravati University, Amravati. The Programme was inaugurated by the Dean of Arts Faculty (Language), Dr. Manoj Tayade.

## ■ विद्यार्थी हितार्थ विद्यापीठाच्या विविध योजना :

- विद्यार्थी सुरक्षा विमा योजना – संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील पदव्युत्तर विभागातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्यादृष्टीने प्रती विद्यार्थी १०/– रुपये एवढे नाममात्र शुल्क आकारून विद्यार्थ्यांचा अपघाती विमा काढण्यात येतो. विमा कालावधीमध्ये विद्यार्थ्याचा अपघात अथवा दुर्देवी मृत्यू झाल्यास विमा कंपनीद्वारे निर्धारित राशी संबंधितांना प्रदान करण्यात येते.
- विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती – विद्यार्थी कल्याण निधीवर मिळणाऱ्या व्याजातून स्नातक विद्यार्थ्यांना रु.१०००/–, स्नातकोत्तर विद्यार्थ्यांना रु. १५००/– व इतर विद्यार्थ्यांना रु.१०००/– इतकी शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. ही योजना विद्यापीठामध्ये १९९९ सालापासून अव्याहतपणे सुरु आहे.
- संत गाडगेबाबा विद्याधन योजना – संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील पदव्युत्तर विभागातील प्रवेशित विद्यार्थ्यांनी अधिकोषातून घेतलेल्या कर्जावर लागणाऱ्या व्याजाची परिपूर्तता करण्यात येते.
- स्व. प्रा. रामप्रकाश शामलालजी राठी शिष्यवृत्ती – या योजनेंतर्गत स्व. प्रा. रामप्रकाश शामलालजी राठी यांचे स्मृतिप्रित्यर्थ देण्यात आलेल्या रू. १,११,०० एवढ्या दाननिधीवरील प्राप्त होणाऱ्या व्याजातून वाङ्मय व समाज विज्ञान विद्याशाखेत प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी रू. १५००/– याप्रमाणे एकूण ५ विद्यार्थ्यांना रू. ७५००/– एवढी शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.
- या शिवाय विद्यापीठाद्वारे संत गाडगेबाबा शुद्ध पेय जल व संत गाडगेबाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना राबविली जाते.
- आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील सदस्यांच्या उच्चशिक्षणामध्ये खंड पडू नये म्हणून संत गाडगेबाबा विद्यार्थी शिक्षण संरक्षण योजना. ही योजना देखील अतिशय सुव्यवस्थितरित्या विद्यार्थी हितार्थ राबविल्या जाते.

## ■ स्वयंरोजगार कार्यशाळा :

विद्यापीठामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण व प्रशिक्षण मिळावे या हेतूने विद्यापीठाद्वारे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना बांबूपासून विविध शोभिवंत वस्तू निर्मितीसंबंधी प्रशिक्षण देण्यात आले. शिका– बनवा– विका हा मूलमंत्र लक्षात घेऊन श्री. सुनील देशपांडे, संचालक, संपूर्ण बांबू केंद्र, लवादा यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचा एकूण २१० विद्यार्थी व १७२ विद्यार्थीनींनी लाभ घेतला.

# STUDENTS' SOCIAL CONTRIBUTION

### Saraswati Samajkarya Mahavidyalaya, Risod, Dist. Washim.



दिनांक २६/०१/२०१७ रोजी लिम्का बुक मध्ये नोंदवलेल्या 'स्वच्छ भारत अभियान' उपक्रमात न. प. वाशिम सोबत महात्मा गांधी यांचा मानवी चष्मा बनविण्यात महाविद्यालयाच्या १५० विद्यार्थ्यांचा सहभाग.



दिनांक ३०/०७/२०१६ रोजी महाराष्ट्र पोलीस मित्र, वूमन सेफ्टी प्रतिसाद ॲप माहिती कार्यशाळेचे आयोजन महा-विद्यालयात संपन्न. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य एस. एन. कोठारी व ठाणेदार रवींद्र देशमुख उपस्थित होते.



दिनांक ०७/०१/२०१७ रोजी 'बळीराजा चेतना अभियान' अंतर्गत श्री सरस्वती समाज-कार्य महाविद्यालयाचे रा.से.यो. स्वयंसेवक नाटिकेतून शेतकरी आत्महत्या विषयी जनजागृती करताना सावित्रीबाई फुले महाविद्यालय येथे यावेळी जिल्हधिकारी श्री. राहुल द्विवेदी, नगर परिषद मुख्याधिकारी श्री. गणेश शेटे, रा. से. यो. जिल्हा समन्वयक डॉ. शुभांगी दामले, सहा. प्रा. यु. ए. घुगे, सहा. प्रा. ए. पी. राऊत, सहा. प्रा. ए. टी. वाघ.



संत गाडगे बाबा यांच्या प्रचार रथाबरोबर (स्मृतिवाहन) जि. प. वाशिम सोबत जिल्ह्यातील गांवामध्ये जनजागृती सहभाग रा. से. यो. व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह प्राध्यापकाचा सहभाग. जि. प. अध्यक्षा सौ.हर्षदा देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. महेश पाटील, प्रा. अतुल राऊत, श्री राजू सरतापे इत्यादींसह गाडगे बाबांचा रथ.



### Vyankatesh Arts, Commerce & Science College, DeulgaonRaja Dist. Buldhana



Students of Department of Botany and Chemistry along with Prof. N.S. Kakade stating the information about Pesticides and Human Health to villagers.

NSS and NCC Volunteers helping the Pilgrims and maintain discipline in Balaji Festival .





NSS volunteers while repairing the check dam on Amna river in Deulgaon Raja.

### Swami Vivekanand Science Mahavidyalaya, Hiwara Ashram, Tq. Mehkar, Dist. Buldana

स्वामी विवेकानंद विज्ञान महाविद्यालय, हिवरा आश्रम, ता.मेहकर, जि.बुलढाणा चा उपक्रम : नागरिकांना माझा मोबाईल... माझी बँक... माझे पाकीट... नोटांशिवाय व्यवहार शक्य आहे. कॅशलेस व्यवहाराचा जागर या बाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिके करून दाखविली. या स्तुत्य उपक्रमाला नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला.




### Shri Shivaji Science College, Amravati.

·"Ek Gattha Raddicha" **(Cycle distribution to needy students through the money earned by collecting old news papers & scrapped old notebooks):**

NSS unit of Shri Shivaji Science College, Amravati has distributed bicycles to poor and needy students of the college on 15th August 2016 the auspicious independence day of India at the hands of Principal Dr. V.G. Thakare and senior teachers of the college. This activity is conducted by collecting old news papers and scrapped old notebooks by NSS volunteers and selling them in market to raise funds. Two meritorious and economically needy students were chosen for cycles.



## Arts & Science College,Kurha, Tq. Teosa, Dist.Amravati.



Swachata Abhiyan & Diwali Snehmilan Sohala at Kalagota (Marda-Paradhi Vasti)

## P. R. Pote (Patil) Welfare Trust's Group of Institutions College of Engineering and Management, Amravati



A program "Atmahatyagrast Shetkari Kutumb Madat Nidhi" was arranged for students who lost their guardians due to suicide.

# STUDENTS' ACADEMIC PERFORMANCE

## G H Raisoni College of Engineering & Management, Amravati

***Design and Fabrication of Multipurpose Pesticide & Fertilizer Solar Sprayer***

**Projectee:**

1)Mr. Vrushabh S. Nagapure 2)Mr. Sangram R. Thakare
3)Mr. ShubhamM.Ingle 4)Mr. Pranav J. Sarode
5)Mr. Sonu P. Ramteke 6)Mr. Roshan R. Charade



Actual model of solar sprayer.



CAD Model of Project

## Babasaheb Naik College of Engineering, Pusad

**Published Research Paper in International Conference at Pattaya, Thailand on 9-10th July 2016.**

1. **Vaishnavi J. Deshpande,** Final Year Computer Sci. & Engg.
2. **Sahil K. Darne,** Final Year Computer Sci. & Engg.
3. **Gautami S. Shinde,** Final Year Computer Sci. & Engg.
4. **Aishwarya K. Deshpande,** Final Year Computer Sci. & Engg.

## Adarsha Science, J. B. Arts & Birla Commerce Mahavidyalaya, Dhamangaon Rly.



**Ms. Aakanksha Tupat** (B.Sc IInd year) – University Color Coat Winner **"AVISHKAR– 2016"** **Ms. Aakanksha Tupat** and **Ms. Aparna Jagtap** receiving certificate and memento at the hands of Hon. Dr. Murlidhar Chandekar, Vice Chancellor, Sant Gadge Baba Amravati University, Amravati. Dr. Aswar, Coordinator, Avishkar – 2016, and Dr. Jaipurkar, Director, BCUD, Sant Gadge Baba Amravati University, Amravati. (Date :16.12.2016)

## Gandhi Vichar Sanskar Examination :



**Ku. Yogita Bhalerao**



**Mr. Suraj Tayde**

Two students of the college Ku.Yogita Bhalerao (B.Sc.IInd year) & Mr. Suraj Tayde (B.Sc. IIIrd year) Obtained first place in Gandhi Vichar Sanskar Examination organized by Gandhi Foundation, Jalgaon. They were awarded with gold medal and certificate of appreciation in a prize distribution ceremony at Achalpur on 10th January, 2017.

## Jawaharlal Darda Institute of Engineering & Technology, Yavatmal.

* **Prasad Nilajkar,** Final Year Electronics & Tele.Comm. - **Animal Repellant Patent** received on 16-12-2016

# STUDENTS' ACHIEVEMENTS

**Sant Gadge Baba Amravati University Students shine at All India Level Students Research Convention:**

1) Mr Vinay Jagdish Nagalkar- Health Sciences
2) Mr.Anand Ramesh Yadav – Social Sciences
3) Mr. Yash Pramod Puri – Engineering sciences



Mr Vinay Jagdish Nagalkar receiving "First Position" with a cash prize of Rs 75,000/- in Health Sciences Category at All India Level

Mr.Vinay Jagdish Nagalkar's proposal entitled "Quantification and identification of Arteriovenous Malformation (AVM)" under the category of health sciences secured First position with a cash prize of Rs. 75,000/- (Seventy five thousand only). He was awarded Prof.S.K. Mukherjee Gold Medal for being adjudged as the best Project across all categories at all India level. Mr. Vinay has made the University proud earlier by winning earlier State level competition four times and Zonal level competition once.



Mr Vinay Jagdish Nagalkar receiving "Prof. S.K. Mukherjee Gold Medal" for being the best project across all categories at All India Level

Mr Yash Pramod Puri's proposal entitled "Smart Dynamic washer" under the category engineering sciences secured second position with a cash prize of Rs. 50,000/- (Fifty Thousand only).



Mr Yash Pramod Puri receiving "second position" with a cash prize of Rs 50,000/- in Engineering Science Category

## Shri Shivaji Science College, Amravati.

Students' Achievements in Avishkar-2017. **Mr. Yash Puri** Selected for Final Round of **National Anveshan – 2017** (He has developed working model of low cost washing machine) which is to be held at Annamalai University, Annamalainagar, Tamilnadu on 27-29th March, 2017.



**Students' Selection at National Level :**

**Mr. Rajesh Vairale**, B.Sc. III, the only student selected from Vidarbha Region, participated and successfully completed Radio Astronomy Winter School-2016, at Inter University Centre for Astronomy and Astrophysics (IUCAA) Pune during 14th to 23rd December, 2016.

# STUDENTS' ACHIEVEMENTS IN SPORTS

## Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati.

### International Players



**Pravin Jadhao**
Archery




**Tushar Shelke**
Archery



**Ku. Mamta Kolamkar**
Athletics



**Anand Bute**
Handball



**Mahendrakumar Motghare**
Handball



**Suraj Tumsare**
Dodgeball



**Dr. Hanumant Lunge**
*Recipient of Shiv Chhatrapati Awardee Coach*

## Sant Gajanan Maharaj College of Engineering, Shegaon.

**Miss. Ruchika Kashelani** (Third year Computer Science & Engg.) Won **GOLD and SILVER MEDAL** at International Event of Aerobics held at **Russia (Moscow)** between 16th -21st Nov. 2016, Won **GOLD Medal** at State Level event of Aerobics held in Jalgaon between 10-11th Aug. 2016 and Bronze Medal at National Level event of Aerobics held at New Delhi between 27-29th Oct. 2017.




**Miss. Ruchika Kashelani**
**Won GOLD and SILVER MEDAL**

## Adarsha Science, J. B. Arts & Birla Commerce Mahavidyalaya, Dhamangaon Rly.



**Ku. Daminee Butle**



**Ku. Devyani Borkar**



**Ku. Vaishnavi Mulwande**



**Mr. Vaibhav Dhanaskar**

1) Ku. Daminee Butle (B.Sc. Ist year)
   - Represented S.G.B. Amravati University in Handball at Inter University tournament at Jaipur.
   - Place IInd at State level Handball at Buldana
   - Selected for National Handball at Raipur (Chhattisgarh).
2) Ku. Devyani Borkar (B.Sc. Ist year)
   - Represented S.G.B. Amravati University in Handball at Inter University tournament at Jaipur
   - Place IInd at state level Handball at Buldana
   - Selected for National Handball at Raipur (Chhattisgarh).
3) Ku. Vaishnavi Mulwande (B.A. Ist year)
   - Represented S.G.B. Amravati University in Handball at Inter University tournament at Jaipur.
4) Vaibhav Dhanaskar (B. Sc. Ist year)
   - Represented state at National Handball tournament at Patna.
   - Participated State Handball tournament at Dhamangaon Rly (Under 19)

## Shri Shivaji College of Arts, Commerce & Science, Akola.



**Anand S. Boratne**

* Youth Festival by Association of Indian Universities 2016-17

* Central Zone Inter University, Pt. Ravishankar Shukla University, Raipur. ( Gold Medal Recipient)

---------

Represented N.S.S. at RD Parade, New Delhi on 26th Jan. 2017.



**Ku. Anuradha Thakare**

## Y.D.V. Arts & Commerce College, Teosa, Dist. Amravati.



अक्षय देवजी गरूड



आनंद रवींद्रराव काळे



मंगेश गजाननराव इंगोले

अक्षय देवजी गरूड (बी.ए. प्रथम वर्ष), आनंद रवींद्रराव काळे (एम.ए.प्रथम वर्ष), मंगेश गजाननराव इंगोले (एम.ए.प्रथम वर्ष) यांनी विद्यापीठाचे प्रतिनिधित्त्व करून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल(मुले) या स्पर्धेत विद्यापीठ संघास रौप्यपदक प्राप्त करून विद्यापीठाचा नावलौकिक उंचावला.

### श्री संत गाडगे बाबांचा दशसूत्री संदेश

| | | | |
|---|---|---|---|
| भुकेलेल्यांना | अन्न | अंध-पंगु-रोग्यांना | औषधोपचार |
| तहानलेल्यांना | पाणी | बेरोजगारांना | रोजगार |
| उघड्या नागड्यांना | वस्त्र | पशु, पक्षी, मुक्याप्राण्यांना | अभय |
| गरीब मुलामुलींना | शिक्षण | गरीब तरुण-तरुणींचे | लग्न |
| बेघरांना | आश्रय | दु:खी व निराशांना | हिंमत |

**हाच आजचा रोकडा धर्म आहे.**
**हीच खरी भक्ती व देवपूजा आहे.**

## क्रिकेट(मुले) चमू :



विद्यापीठास प्रथमत: प्रथम स्थान

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची क्रिकेट (मुले) चमू बरकत–उल्लाह विद्यापीठ, भोपाल येथे दिनांक १५ ते २८ जानेवारी, २०१७ या कालावधीत संपन्न झालेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेमध्ये चमूने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून विद्यापीठाचे इतिहासामध्ये प्रथमतःच प्रथम स्थान प्राप्त करून विद्यापीठाचे नावलौकिक केले. ही चमू अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र ठरलेली असून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा बरकतउल्लाह विद्यापीठ, भोपाल येथे दिनांक १२ ते १५ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत संपन्न झाली. या चमूला व्यवस्थापक श्री. विनोद कपिले, डॉ.आर. जी. राठोड महाविद्यालय, मुर्तिजापूर व चमू प्रशिक्षक म्हणून श्री.राहुल रडके, श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड यांचे मार्गदर्शन लाभले.

## सॉफ्टबॉल (मुले) चमू :



आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची सॉफ्टबॉल (मुले) चमू महात्मा गांधी विद्यापीठ, कोटाम द्वारा आयोजित यु.सी.महाविद्यालय, अलुवा येथे दिनांक २८ जाने., २०१७ ते ०१ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेमध्ये चमूने आपले खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करून द्वितीय स्थान प्राप्त केले. या चमूला व्यवस्थापक म्हणून श्री.चंद्रशेखर इंगोले, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर तर प्रशिक्षक म्हणून श्री.अभिजित इंगोले, हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालय, आष्टी जि.वर्धा यांचे मार्गदर्शन लाभले.

## फुटबॉल (मुले) चमू :



विद्यापीठाचा लौकिक उंचावला

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची फुटबॉल (मुले)चमू बरकतउल्लाह विद्यापीठ, भोपाल येथे दिनांक ०४ ते १३ जानेवारी, २०१७ या कालावधीत संपन्न झालेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेमध्ये चमूने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून द्वितीय स्थान प्राप्त करून विद्यापीठाचे नावलौकिक केले. ही चमू अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र ठरली. या चमूला व्यवस्थापक श्री. नानासाहेब सपकाळ, भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश महाविद्यालय, पिंजर व चमू प्रशिक्षक म्हणून श्री.अफताब मुझम्मील, इन्डो पब्लिक स्कुल, अमरावती यांचे मार्गदर्शन लाभले.

## फुटबॉल (मुली) चमू :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची फुटबॉल (मुली) चमू हेमचंद्रचार्य उत्तर गुजरात विद्यापीठ, पाटण येथे दिनांक ०५ ते ०९ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत संपन्न झालेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेमध्ये चमूने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून तृतीय स्थान प्राप्त करून विद्यापीठाचे नावलौकिक केले. या चमूला व्यवस्थापक श्री.एस.एच.मेश्राम, ह.व्या. शा. क्री .मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ व चमू प्रशिक्षक म्हणून श्री.अमित गोयनका, अमरावती यांचे मार्गदर्शन लाभले.

## कबड्डी (मुले) चमू :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची कबड्डी (मुले) चमू जय नारायण व्यास विद्यापीठ, जोधपूर येथे दिनांक ०९ ते १४ जानेवारी, २०१७ या कालावधीत संपन्न झालेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेमध्ये चमूने चवथे स्थान प्राप्त केले व चमू अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र ठरली. या चमूला व्यवस्थापक श्री.योगेश भोसले, महात्मा फुले महाविद्यालय, पातूर व चमू प्रशिक्षक म्हणून श्री.अनिल फेंडर, जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी व तांत्रिकी संस्था, यवतमाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

## हॉकी (मुले) चमू :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची हॉकी (मुले) चमू एल. एन. आय. पी.ई.ग्वालीअर येथे दिनांक २६ ते ३० डिसेंबर, २०१६ या कालावधीत संपन्न झालेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेमध्ये चमूने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन चवथे स्थान प्राप्त करून विद्यापीठाचे नावलौकिक केले. ही चमू अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र ठरली. या चमूला व्यवस्थापक श्री.सतीश मोदाणी, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती व चमू प्रशिक्षक म्हणून श्री.ए.एन.खान, राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, चांदूर रेल्वे यांचे मार्गदर्शन लाभले.

## बॉक्सिंग (मुले) चमू :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची बॉक्सिंग (मुले) चमू लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवारा (जालंधर) येथे दिनांक ३० जानेवारी, २०१७ ते ०४ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेमध्ये चमूतील खेळाडू श्री.साद सैय्यद, गुलामनबी आझाद महाविद्यालय, बार्शी टाकळी या खेळाडूने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून ६० किलो वजन गटात कांस्य पदक प्राप्त करून विद्यापीठाचे नावलौकिक केले. या चमूला व्यवस्थापक श्री.संजय काळे, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला व चमू प्रशिक्षक म्हणून श्री.अक्षय टेंभूर्णीकर, पातूर यांचे मार्गदर्शन लाभले.

## धनुर्विद्या (मुले) चमू :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची धनुर्विद्या (मुले व मुली) चमू क्रिष्णा विद्यापीठ, मछलीपटनम येथे दिनांक १५ ते १९ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेमध्ये इंडियन राऊंड (मुले) या खेळ प्रकारातील चमूतील खेळाडू श्री.गिरीश रत्नाकर कुकडे, सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती या खेळाडूने वैयक्तिक ३० मिटर व संमिश्र चमूमध्ये अनुक्रमे द्वितीय व कु.कविता, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती या खेळाडूने वैयक्तिक संमिश्र चमूमध्ये द्वितीय स्थान प्राप्त केले. तसेच रिकव्हर राऊंड (मुले) या खेळप्रकारामध्ये चमूतील खेळाडू श्री.प्रवीण रमेश जाधव, श्री.शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती या खेळाडूने वैयक्तिक ७० मिटर मध्ये प्रथम, ओव्हरऑल या खेळप्रकारात प्रथम तर वैयक्तिक ऑलम्पिक या खेळप्रकारामध्ये द्वितीय स्थान प्राप्त केले. या चमूला व्यवस्थापक म्हणून श्री.पी.बी.गायकवाड, जी.बी.मुरारका महाविद्यालय, शेगांव तर प्रशिक्षक म्हणून श्री.विकास वानखडे, अमरावती यांचे मार्गदर्शन लाभले.

## विश्व आंतर विद्यापीठ धनुर्विद्या (मुले) स्पर्धा व निवड चाचणी :

विश्व आंतर विद्यापीठ धनुर्विद्या (मुले व मुली) स्पर्धा दिनांक १ ते ५ जून, २०१६ या कालावधीत उल्लानवातर (मोंगोलिया) येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. यास्पर्धेच्या निवड चाचणीकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ धनुर्विद्या (मुले) चमूतील खालील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती.

| अ.क्र. | विद्यार्थाचे नांव | महाविद्यालयाचे नांव |
|---|---|---|
| ०१. | श्रीरंग सावरकर | श्री.तुळशीरामजी जाधव महाविद्यालय, वाशिम. |
| ०२. | तुषार शेळके | श्री शिवाजी कला व वाणिज्य महा., अमरावती. |
| ०३. | प्रवीण जाधव | श्री शिवाजी कला व वाणिज्य महा., अमरावती. |

निवड चाचणी दिनांक २१ ते २२ एप्रिल, २०१६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेकरिता विद्यापीठाच्या धनुर्विद्या मुले चमूतील खेळाडू श्री. प्रवीण जाधव, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती या विद्यार्थ्याची निवड करण्यात आली. या खेळाडूने विश्व आंतर विद्यापीठ धनुर्विद्या (मुले) चमूमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधीत्त्व करून विद्यापीठास नावलौकिक मिळवून दिले.

# STUDENTS' ACHIEVEMENTS IN CULTURAL ACTIVITIES

## महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य-२०१६ युवा महोत्सव चमू :

मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रेरणेने सत्र २००३-२००४ पासून महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सवाचे आयोजन दरवर्षी करण्यात येत असून यावर्षी या महोत्सवाचे आयोजन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे दिनांक ०५ ते ०९ नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ युवा महोत्सव चमू सहभागी झाली होती.

या स्पर्धेमध्ये चमूने खालीलप्रमाणे प्रावीण्य प्राप्त केले.

| अ.क्र. | कला प्रकार | प्रावीण्य स्थान |
|---|---|---|
| ०१. | वक्तृत्व स्पर्धा | तृतीय स्थान |
| ०२. | स्पॉट फोटोग्राफी | तृतीय स्थान |

## मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव चमू :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ युवा महोत्सव चमू पं.रविशंकर शुक्ल विद्यापीठ, रायपूर येथे दिनांक १७ ते २१ नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत संपन्न झालेल्या मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे युवा महोत्सव चमूने खालील प्रमाणे दर्शविलेल्या कला प्रकारांमध्ये घवघवीत यश प्राप्त केले आहे. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कला प्रकार | प्रावीण्य स्थान | अ.क्र. | कला प्रकार | प्रावीण्य स्थान |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | फोक ऑर्केस्ट्रा | तृतीय | ०६. | पाश्चात्य सोलो | तृतीय |
| ०२. | पाश्चात्य समुहगान | तृतीय | ०७. | एकांकिका | द्वितीय |
| ०३. | शास्त्रीय गायन | तृतीय | ०८. | मिमिक्री | तृतीय |
| ०४. | सुगम संगीत | तृतीय | ०९. | वादविवाद | तृतीय |
| ०५. | स्वर वाद्य सोलो | तृतीय | १०. | कार्टुनिंग | तृतीय |
| ११. | संगीत ओव्हर ऑल रनर अप ट्रॉफी | | | | |

मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत उपरोक्त कला प्रकार व उर्वरित कला प्रकार यांचा सहभाग सुद्धा अत्यंत अप्रतिम ठरला असून या चमूस मा.श्री.एम.टी.देशमुख, सांस्कृतिक समन्वयक यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. तसेच चमू व्यवस्थापक म्हणून डॉ.रजनी देशमुख, भारतीय महाविद्यालय, अमरावती, श्री.निखिलेश नलोडे, श्रीमती नानकीबाई वाधवानी महाविद्यालय, यवतमाळ यांनी सुद्धा उत्तमरित्या मार्गदर्शन केले.

## महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव -२०१६ चमू :

महाराष्ट्र राज्य पंधरावी आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव -२०१६ स्पर्धा आयोजित करण्याची जबाबदारी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी यांचेकडे सोपविण्यात आली होती. या स्पर्धा दिनांक २७ नोव्हेंबर, २०१६ ते ०१ डिसेंबर, २०१६ या कालावधीत संपन्न झाल्या. या स्पर्धेत खालील खेळांचा समावेश करण्यात आला होता.

| अ.क्र. | खेळाचे नांव | विभाग | अ.क्र. | खेळाचे नांव | विभाग |
|---|---|---|---|---|---|
| अ | कबड्डी | मुले व मुली | ब | खो-खो | मुले व मुली |
| क | व्हॉलीबॉल | मुले व मुली | ड | बास्केटबॉल | मुले व मुली |
| इ | मैदानी स्पर्धा | मुले व मुली | | | |

या स्पर्धेमध्ये उपरोक्त क्रीडा प्रकारांमध्ये विद्यापीठाच्या चमू व खेळाडू सहभागी झाले होते. त्यामध्ये व्हॉलीबॉल (मुले) या क्रीडा प्रकारात द्वितीय स्थान प्राप्त झाले. तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारामध्ये मैदानी स्पर्धा मुले चमूतील खेळाडू श्री.अनसार दर्जीवाले, आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुर्जना घाट या खेळाडूने १५०० मीटर धावणे या स्पर्धा प्रकारात रौप्य पदक प्राप्त केले.

## विद्यापीठ उत्कृष्ट खेळाडू व उत्कृष्ट कलावंत (मुले व मुली) पुरस्कार २०१५-१६:

| | |
|---|---|
| उत्कृष्ट खेळाडू (मुले ) | श्री.तुषार प्रभाकरराव शेळके<br>श्री.शिवाजी कला व वाणिज्य महा., अमरावती |
| उत्कृष्ट खेळाडू ( मुली) | ---निरंक----- |
| उत्कृष्ट कलावंत (मुले) | ---निरंक--- |
| उत्कृष्ट कलावंत (मुली) | कु.अपूर्वा शंतनु कुऱ्हेकर |

विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रावीण्यासोबत विद्यार्थ्यांचे क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील नैपुण्य सुद्धा त्यांचे व्यक्तिमत्त्व विकासासाठी तितकेच महत्त्वाचे असते. याचा अनुभव विद्यापीठाला क्रीडा व सांस्कृतिक नैपुण्य मिळविणाऱ्या उत्कृष्ट खेळाडू व उत्कृष्ट कलावंत पुरस्कार निवड प्रक्रियेतून सातत्याने मिळत आला आहे आणि या अंगीकृत कार्यात सतत अग्रेसर राहण्यासाठी विद्यापीठ आपली वाटचाल करीत आहे.


EDITORIAL BOARD



* Chief Editor*
Dr. S.F.R. Khadri
Director IQAC

* Editors*


Dr.A.M.Asanare


Dr. G.G.Malte


Dr.G.L.Gulhane


Dr.Mrs.M.M Chimote


Dr. Ms.N.A.Ghanwate


Dr. S.P. Joshi


Dr. Vilas Nandurkar


Dr. H.S. Lunge


Dr. Mahendra Mete


Shri. Vivek Hiware


Dr. Ashalata Raman


Prof.A.A.Nandgaonkar


Ms. J.S. Patil


Dr. Ajay B. Lad


Shri. Pravin Hamjade


Shri. S.S. Muley


Prof. G.R. Jadhao



**Address For Correspondence**: Chief Editor, Sant Gadge Baba Amravati University Bulletin "ACE", Internal Quality Assurance Cell (IQAC), Sant Gadge Baba Amravati University, Amravati (M.S.)-444602 Mobile-9423425393, email: sfrkhadri@sgbau.ac.in



**Published by : Dr. Ajay Deshmukh, Registrar, Sant Gadge Baba Amravati University, Amravati - 444602**